# मुंबई विद्यापीठ

मशिमाक/०९ /२०२४—२०२५

परिपत्रक :—

विषय:—विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन स्तरावर गुणवंत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची शिफारस करणेबाबत

मुंबई विद्यापिठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, समाजशास्त्र, गृहविज्ञान व नृत्य, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, स्थापत्यशास्त्र आणि हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबधित संस्थाचे अध्यक्ष/यांना कळविण्यात येते की, सन २०२३—२०२४ या शैक्षणिक वर्षाकरिता मुंबई विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन स्तरावर गुणवंत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा विद्यापीठातर्फे विद्यापीठाने निर्धारित केलेल्या निकषांच्या आधारावर निवड करून तसेच विद्यापीठातर्फे निवड होणाऱ्या गुणवंत शिक्षकेतर कर्मचा—यांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह तसेच रोख रूपये ५,०००/ (रूपये पाच हजार फक्त) देऊन गौरविण्यात येईल.

तरी या परिपत्रकाद्वारे सर्व संबधितांना असे कळविण्यात येते की, महाविद्यालयाच्या सेवेत नाविण्यपूर्ण, कौशल्यपूर्ण आणि आदर्शवत काम केलेले आहे.

आपणास अशी विनंती करण्यात येते की, ज्या महाविद्यालयीन शासनमान्य, अनुदानित विनाअनुदानित संलग्नित महाविद्यालयातील ज्यांची किमान २० वर्षे सेवा झालेली आहे तसेच ज्यांनी विशेष गुणवत्ता व अर्हता धारण केली आहे अशा एक किंवा दोन पात्र शिक्षकेत्तर कर्मचा—यांचे प्रस्ताव संपूर्ण माहितीसह उपकुलसचिव, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभाग, २०४, दुसरा मजला, विद्यापीठ मुख्य इमारत, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२ याचेकडे आवक विभागामार्फत **सोमवार दिनांक १५ जुलै, २०२४** पर्यंत सादर करावेत दिनांक **१५ जुलै, २०२४** नंतरचे प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. तसेच अपुऱ्या माहितीसह पाठविलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच ज्या शिक्षकेत्तर कर्मचारी यांची शिफारस करावयाची, त्यांची माहिती सोबत जोडलेल्या अर्जामध्ये नेमणूकीच्या पत्राची प्रत, तसेच अन्य सर्व कागदपत्रांच्या सत्य प्रती तसेच पोलिस अहवाल सहप्रस्तावासोबत ३ प्रतित पाठविणे आवश्यक आहे. (तसेच संबधित कर्मचाऱ्यांची १० ते १५ ओळीत संक्षिप्त माहिती/ त्यांचा दूरध्वनी क्रमांक/ महाविद्यालयांचा दूरध्वनी क्रमांक व घरचा पूर्ण पत्ता) स्वतंत्र पानावर लिहून जोडण्यात यावा.

मुंबई— ४०००३२
दिनांक २६ जून, २०२४

(डॉ. बळीराम गायकवाड)
कुलसचिव (प्रभारी)
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापिठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, समाजशास्त्र, गृहविज्ञान व नृत्य, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, स्थापत्यशास्त्र आणि हॉटेल मॅनेजमेंट महाविद्याल यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी. (उपरोक्त संदर्भातील परिपत्रक व जोडपत्र विद्यापीठाने संकेत स्थळ www.mu.ac.in वर उपलब्ध आहे.)

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही अगेषित:—

१) कुलगुरूंचे कार्यकारी सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२

२) स्वीय सहायक, प्र. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२

३) स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२

४) वित्त व लेखा अधिकारी, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२

# मुंबई विद्यापीठ

सन २०२३—२०२४ करिता गुणवंत पुरस्कार, आपल्या महाविद्यालयातील शिफारस करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची खालील माहिती **सोमवार दिनांक १५ जुलै, २०२४** पर्यंत उपकुलसचिव, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभागाकडे सादर करावी.

| | | |
|---|---|---|
| १. | कर्मचाऱ्यांचे संपूर्ण नाव | |
| २. | सेवा पुस्तिका क्रमांक | |
| ३. | कर्मचारी संकेतांक क्रमांक | |
| ४. | महाविद्यालयातील कायमस्वरूपी तत्वावरील नियुक्तीचा दिनांक | |
| ५. | सेवेचा कालावधी वर्षे | |
| ६. | हुददा | |
| ७. | कार्यालयीन उपस्थिती नियमित/अनियमित | |
| ८. | वर्तणूक | |
| ९. | कार्यालयीन कामकाजातील वक्तशीरपणा | |
| १०. | शिस्तभंगाची कारवाई अथवा ज्ञापन देण्यात आले आहे का? होय/ नाही असल्यास त्याबाबतची माहीती | |
| ११. | पोलीस अहवाल | |
| १२. | सेवेत असताना यापूर्वी पारितोषिक/बक्षिस | |
| १३. | प्राचार्य यांची शिफारस महाविद्यालय सेवेत नाविन्यपूर्ण, कौशल्यपूर्ण आणि आदर्शवत केलेल्या कामाची सविस्तर माहिती देणे | |
| | | प्राचार्य<br>(महाविद्यालयाचा शिक्का ) |